Sharda Cropchem Limited

Tel. : +91 22 66782800
FAX : +91 22 66782828 / 66782808
E-mail : office@shardaintl.com
Regd. Office : Prime Business Park, Dashrathlal Joshi Road, Vile Parle (W),
Mumbai - 400056, India.
www.shardacropchem.com

ISO 9001: 2015 Reg. No: 702949
CIN: L51909MH2004PLC145007

15th July, 2026

To,

National Stock Exchange of India Limited Exchange Plaza, 5th Floor, Plot No. C/1, G-Block, Bandra Kurla Complex, Bandra (E), Mumbai – 400 051 **Trading Symbol: SHARDACROP**	**BSE Limited** Phiroze Jeejeebhoi Tower, Dalal Street, Mumbai – 400 001 **Scrip Code: 538666**

Re: Newspaper Advertisement – 23rd Annual General Meeting of the Company.

Dear Sir/Madam,

Pursuant to Regulation 30 and Regulation 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, we enclose herewith the copies of newspaper advertisement published in Economic Times, Mumbai Edition (English Language) and Maharashtra Times, Mumbai Edition (Marathi Language) on 15th July, 2026 intimating that the 23rd Annual General Meeting of the Company will be held on Friday, 14th August, 2026 at 01:00 p.m. IST through Video Conferencing ("VC") / Other Audio Visual Means ("OAVM").

The Register of Members and Share Transfer Books of the Company will remain closed on Saturday, 08th August, 2026.

The Company has fixed Friday, 7th August, 2026 as Record Date for determining eligibility of members to final dividend for the financial year ended 31st March, 2026.

The remote e-voting period shall start on Tuesday, 11th August, 2026 from 9:00 A.M. (IST) and end on Thursday, 13th August, 2026 at 5:00 P.M. (IST). The remote e-voting shall not be allowed beyond the said date and time.

Any person, whose name appears in the register of members / beneficial owners as on the cut-off date i.e. Friday, 7th August, 2026 only shall be entitled to avail the facility of remote e-voting or e-voting at the AGM.

The copy of the Annual Report of the Company for the FY 2025-26 along with the Notice convening the AGM has already been sent through electronic means to the Members on 14th July, 2026, whose e-mail addresses were registered with the Company / RTA / Depository Participant(s).

Request you to take the same on record.

Thanking you,
Yours Sincerely,

FOR SHARDA CROPCHEM LIMITED

Jetkin Gudhka

Digitally signed by Jetkin Gudhka
DN: c=IN, o=Personal, postalCode=400049, l=Mumbai, st=Maharashtra, street=E-2, juhu apartments, juhu road, Juhu S.O, Maharashtra India- 400049- juhu koliwada, revadankar marg, title=5293, 2.5.4.20=2ed7db12c75e594a8a6cedda1434b872a7f73c48c734ffb55fbafc1ef2f32021, serialNumber=61103cdda8512f3aae0ec87641ba84afd395c81fa6ae55be27537a86453bde15, email=jetkingutka@gmail.com, cn=Jetkin Gudhka
Date: 2026.07.15 11:19:29 +05'30'

JETKIN GUDHKA
COMPANY SECRETARY &
COMPLIANCE OFFICER
Encl: as above

Trump Drops Hormuz Fee Plan in Favour of Gulf Investment Deals

In VAR or War, Nobody Reverses It Faster Than The Don

Cairo | Dubai | Washington: US President Donald Trump stepped back from a proposal to charge a 20% transit fee to guard the vital Strait of Hormuz waterway as part of the conflict with Iran, saying on Tuesday he would instead seek investment deals with Gulf states.

US forces had carried out waves of attacks for the third night in a row after Tehran said it had closed the strait, prompting Trump on Monday to reinstate a blockade of Iranian shipping and propose the fee. But just a little under five hours before the fee had been due to come into effect at 1.30 AM (on Wednesday), Trump said the strait was open to all shipping traffic except that of Iran. "Based on highly productive conversations with Middle East (West Asia) leadership, I have decided to replace the 20% United States Reimbursement Fee with Trade and Investment Deals that the various Gulf States will be making into the United States," he said in a post on Truth Social.

SHIPPERS HAD OPPOSED FEES

The move to impose US fees had drawn sharp criticism. The UN shipping agency said it opposed any fees for straits used in international navigation and that there was no legal basis for introducing mandatory tolls on strait transits. Germany's Hapag-Lloyd, the world's fifth-largest container shipping company, said it would be "fundamentally wrong". Trump said later on Tuesday that he did not like the concept of a fee for using the strait and said countries had called him to say they wanted to invest in the US instead of being charged a fee. It was not immediately clear what Gulf states had agreed to, if anything. Trump did not mention any commitments by them, saying only in his post: "Investments will be MASSIVE but, at the same time, extraordinarily good for them, and their future."

TEASES MASSIVE DEALS WITH IRAQ

Trump also said on Tuesday that massive new oil deals with Iraq would be announced soon as he hosted Prime Minister Ali al-Zaidi and hailed the prospect of American companies doing more business in the country.

"Iraq has tremendous potential because of their oil and because of other things," Trump said at the White House. "We're going to create a lot of jobs for both countries, and we're going to be taking out a lot of oil. A lot of oil is coming out, and the American companies are doing it."

Trump said there would be "a lot of deals" and announcements could be coming "this week or next week."

He didn't share any details, just describing them as "massive, among the largest."

Al-Zaidi stressed on Tuesday that there will be no justification for their existence after September 30.

A Trump administration official said ahead of the Oval Office meeting that the U.S. will make "informed" decisions based on Iraq's efforts to disarm Iranian-backed militias inside its borders.

The official insisted on anonymity to discuss the administration's strategy ahead of al-Zaidi's visit.

Al-Zaidi has been called 'Trump of the Middle East'. **Agencies**

> **I have decided to replace the 20% United States Reimbursement Fee with Trade and Investment Deals that the various Gulf States will be making into the United States**
>
> **DONALD TRUMP**
> President, US

China's June Exports Up 27% Y-o-Y on Tech Boom

Beijing: China's exports surged in June, buoyed by orders for chips to fuel the global AI boom and automobiles, deepening producers' reliance on overseas buyers as policymakers in the world's No 2 economy continue to grapple with how to boost demand at home.

The stronger-than-expected trade performance keeps China on track to post a surplus topping $1 trillion for a second straight year, with factories sustaining sales despite slowing growth in major economies and trade frictions with Washington.

Exports climbed 27% from a year earlier in US dollar value terms, customs data showed on Tuesday, their best performance in four months, outpacing the 19.4% gain in May and an 18.2% rise forecast by economists.

Imports jumped 36%, compared with a 27.4% gain the month before, a five-year high.

China's monthly car exports topped 1 million for the first time in June, data showed, which risks heightening tensions with partners such as the EU. Meanwhile, China sold to the world 32 billion integrated circuits. **Reuters**

ET GRAPHICS

How SpaceX Stock Fares After 1 Month

The massive public listing of Elon Musk's SpaceX opened with much fanfare in June, but one month on, the returns of the world's biggest ever IPO are relatively muted when compared to the performance of the other names in the list of the world's top 10 IPOs. Here's the full list. By ET Data Team

ONE-MONTH STOCK RETURNS FOR THE WORLD'S 10 BIGGEST IPOS EVER

	Amount raised ($ b)	1-month returns (%)
Visa (2008, US)	19.7	52.4
ICBC (2006, China)	21.9	33.2
Alibaba (2014, US)	25.0	19.6
NTT DoCoMo (1998, Japan)	18.1	15.1
AIA Group (2010, Hong Kong)	20.5	14.6
Saudi Aramco (2019, Saudi Arabia)	29.4	9.4
SpaceX (2026, US)	85.7	7.6
AgBank (2010, China)	22.1	5.9
General Motors (2010, US)	23.1	3.0
SoftBank Corp (2018, Japan)	23.5	-4.7

Note: Sorted in descending order of returns. The IPO size ranking takes into account extra shares sold under greenshoe option where applicable. ICBC: Industrial and Commercial Bank of China.

Source: Bloomberg, ET research

Ukraine Downs 5 Russian Ballistic Missiles over Kyiv

Kyiv: Ukraine's air force said Tuesday it downed five ballistic missiles launched by Russia in a raft of overnight attacks, although other missiles and drones got through and hit warehouses and a school in the capital Kyiv.

It was the first time in almost two weeks that Ukraine said it had intercepted Russian ballistic missiles, which are harder to stop than drones or cruise missiles and have pummeled the country in Moscow's 4-year-old full-scale invasion.

Ukrainian air defenses likely used the US-made Patriot surface-to-air guided missile system that is the most effective way of countering ballistic missiles, but ammunition for it has been in short supply amid the Iran war.

Ukrainian President Volodymyr Zelenskyy is in Paris this week to change that, announcing his country is joining with nine other nations to form a coalition that will build a shared ballistic missile shield for Europe. On Monday, he said Ukraine and its partners could jointly develop a mass-produced, low-cost system in the next 12 months. **AP**

Nasa Astronaut Anil Menon Embarks on 8-month Sojourn

Nasa astronaut Anil Menon and two Russian cosmonauts on Tuesday lifted off onboard a Soyuz MS-29 spacecraft from Kazakhstan on an eight-month mission to the International Space Station.

The Roscosmos spacecraft carrying Menon and Russian cosmonauts lifted off from the Baikonur cosmodrome at 8:17 PM. After a two-orbit, three-hour trip to the station, the spacecraft will automatically dock at 11:56 pm IST to the Prichal module. This marks Menon's first spaceflight and the second flight for the Russian cosmonauts, according to Nasa. **PTI**

Snubbing Gates, Buffett to Gift Berkshire Stake to Family's Charities

Warren Buffett is ramping up the pace of his annual donations of Berkshire Hathaway shares to charitable organisations run by his three children, putting him on track to completely dispose of his stake in the company over the next eight years.

For the first time in two decades, Buffett decided to skip his midyear donations to the Gates Foundation and didn't list that among the organisations that will receive future gifts. That comes after a trove of documents released earlier this year by the US justice department reignited scrutiny of Bill Gates' ties to Jeffrey Epstein.

Instead, the 95-year-old philanthropist and chairman of Berkshire Hathaway plans to convert 8,000 Class A shares into 12 million Class B shares and give one million shares each to the Sherwood Foundation, the Howard G. Buffett Foundation and the NoVo Foundation, which are each led by one of his children, according to a statement Tuesday.

The billionaire is also giving 9 million shares to the Susan Thompson Buffett Foundation, named after the billionaire's late wife.

"Of course, mortality is unpredictable, but my remaining shares will be donated to the four foundations one way or the other by December 31, 2034," Buffett said. **Bloomberg**

PRICES EASE 0.4% IN JUNE OVER MAY

A First in 6 Years: US Consumer Inflation Sees Monthly Fall

US consumer inflation cooled more than expected in June, government data showed Tuesday, as energy prices fell on a temporary easing of the US-Iran war.

However, as oil prices rise on the recent renewal of est Asian hostilities, and US President Donald Trump's order to restart a blockade of Iranian ports, the progress could be fleeting.

The consumer price index (CPI) rose by 3.5% on a year-on-year basis in June, down from a 4.2% increase in May, according to Labor Department data. The figure marked a pullback from a three-year high, as a drop in energy costs more than offset upticks in housing and food prices.

Analysts had anticipated a larger 3.8% CPI, according to economists surveyed by *Dow Jones Newswires* and *The Wall Street Journal*. All eyes are now on Federal Reserve Chairman Kevin Warsh as he appears before the House Financial Services Committee following his first interest rate meeting at the helm of the central bank.

'CORE' CPI UP 2.6% ON-YEAR

Excluding the volatile food and energy sectors, "core" CPI was up by 2.6% year-on-year in June, also below May's reading.

Overall CPI fell by 0.4% between May and June, the first month-on-month decline since 2020.

White House economic advisor Kevin Hassett told *Fox News* that Tuesday's report was "absolutely the best inflation report we've seen in about six years."

While energy costs fell in June, the cost of food climbed by 0.2% on a monthly basis
Bloomberg

US gasoline costs plunged by 9.7% in June on a month-on-month basis — though still higher than a year ago. While energy costs slumped in June, the cost of food climbed by 0.2% on a monthly basis. The Fed's preferred inflation gauge, the Personal Consumption Expenditures (CPE) price index, is due to be released July 30.

> **The National Federation of Independent Business index increased 2.1 points to 97.4 last month, showed data on Tuesday**

SMALL BUSINESS OPTIMISM RISES

Meanwhile, an index of US small business optimism rose in June by the most in more than a year as lower oil prices offered firms some relief.

The National Federation of Independent Business index increased 2.1 points to 97.4 last month, showed data on Tuesday. That's the highest since February, before the Iran war sharply drove up energy prices. **Agencies**

CCI NG 3.7 Product: MTMumbaiBS PubDate: 15-07-2026 Zone: Mumbai Edition: 1 Page: MTMPOPED User: amit.patil2@timesofindia.com Time: 07-14-2026 23:29 Color:

मल्लिनाथ - कालिदासाचा टीकाकार

निर्मला कुलकर्णी
mtedit@timesofindia.com

महाकवी कालिदासाची जन्मतिथी उपलब्ध नसली तरी, त्याच्या जगप्रसिद्ध 'मेघदूत' या खंडकाव्याच्या पहिल्या श्लोकाची सुरुवात 'आषाढस्य प्रथम दिवसे' (आषाढाचा पहिला दिवस) अशी होते. याच उल्लेखावरून आषाढाचा पहिला दिवस 'कालिदास दिन' म्हणून साजरा करण्याची परंपरा सुरू झाली. आजच्या कालिदास दिनानिमित्त...

चित्र: एआय

कालिदास हा संस्कृत वाङ्मयातला मेरुमणी. त्याच्या साहित्यावर टीका लिहिणे विद्वत्तेचे गमक मानले जाई. कालिदासाचा काळ विवाद्य असला तरी साधारणतः विद्वानांना मान्य असलेला काळ म्हणजे इसवी सनाचे चौथे किंवा पाचवे शतक. त्यावर या काळानंतर टीका वाङ्मय झाले. रघुवंशावरची वल्लभदेवाची रघुपंचिका ही दहाव्या शतकातली सर्वात जुनी उपलब्ध असलेली टीका आहे. परंतु, फक्त कालिदासाच्याच नव्हे तर संस्कृतमधल्या पाचही महाकाव्यांवर आणि इतर दोन महत्त्वाच्या शास्त्रग्रंथांवर टीका लिहिणारा मल्लिनाथ हा संस्कृतमधला प्रसिद्ध टीकाकार. त्याच्यावरूनच मराठीमध्ये टीका करणे, मत नोंदवणे या अर्थी 'मल्लिनाथी करणे' असा वाक्प्रचार रूढ झाला.

मल्लिनाथ हा कोलाचल मल्लिनाथ म्हणून ओळखला जातो. त्याचे मूळ गाव आजच्या तेलंगणामधल्या मेडक जिल्ह्यातले कोलाचल. कामकायन गोत्रातल्या तेलुगु ब्राह्मण कुटुंबात त्याचा जन्म झाला. सुरवातीला त्याचे कुटुंबीय एकशिलानगर (ओरुगल, वरंगळ) इथे राहत होते. काकतीय राजवटीमधला प्रतापरुद्रदेव (दुसरा) हा खूप प्रसिद्ध, धोरणी आणि कलांची आवड असलेला राजा. त्याची वरंगळ ही राजधानी होती. मल्लिनाथाच्या विद्वान घराण्यातले काहीजण काकतीय राजांच्या दरबारात होते. मल्लिनाथाचे आजोबाही खूप मोठे विद्वान होते. त्यांचा कनकाभिषेक समारंभ प्रतापरुद्रदेवाने (प्रतापरुद्रदेव दुसरा इ.स.१२८९-१३२३) केला होता.

पुढे अल्लाउद्दिन खिलजी आणि तुघलक यांच्या चढाईमुळे काकतीय राजघराण्याचा ऱ्हास झाला. 'अनाश्रया न शोभन्ते पण्डिता वनिता लताः' या उक्तीनुसार विद्वानांना राजाश्रयाची आवश्यकता असते. त्यामुळे प्रतापरुद्रदेवाच्या पदरी असलेल्या अनेक विद्वानांनी सिंगभूपाल राजाच्या राजधानीला, राचकोंडाला स्थलांतर केले. मल्लिनाथदेखील याच गावात नावारूपाला आला असावा. इ.स. १३८५ ते १३९९ हा सर्वज्ञ सिंगभूपाल या राजाचा कार्यकाल मानतात. या राजाने मल्लिनाथाला महामहोपाध्याय (तेलुगुमध्ये बिरुदु) ही पदवी दिली होती. मल्लिनाथाला दोन पुत्र होते असे म्हणतात. पेद्दिभट्ट आणि कुमारस्वामिन्, त्यापैकी त्याच्या धाकट्या मुलाला 'महोपाध्याय' ही पदवी मिळाली होती.

मल्लिनाथाने उद्धृत केलेल्या ग्रंथांच्या आधारे मल्लिनाथ इ.स. १३५० ते १४५० मध्ये कधीतरी होऊन गेला असावा असे विद्वानांचे मत आहे. प्रा. पी. जी. लाळ्ये यांनी सिद्ध केले आहे. आत्मविश्वास हा मल्लिनाथाचा विशेष मानता येईल. त्याने मुद्दाम या प्रसिद्ध काव्यांवर टीका का लिहिल्या याचे कारण तो दोन ग्रंथकर्त्यांवरच्या टीकांमध्ये देतो. त्याच्या मते हे ग्रंथ 'दुर्व्याख्याविषमूर्च्छित' (वाईट टीकारूपी विषामुळे संवेदना हरवून बसलेले) होते. त्या ग्रंथांना मूर्च्छित अवस्थेतून बाहेर काढण्यासाठी त्याने त्यावर टीका लिहिल्या.

मल्लिनाथाने कालिदासाच्या आणि श्रीहर्षाच्या महाकाव्यांवर लिहिलेल्या टीकांची नावेही त्याची ही भूमिका स्पष्ट करतात. कालिदासाने दोन महाकाव्ये रचली; कुमारसंभव आणि रघुवंश. कालिदासाचे मेघदूत हे अजरामर खंडकाव्य आहे. या तीनही काव्यांवरच्या टीकांना मल्लिनाथाने 'संजीवनी' असे नाव दिले आहे. तो म्हणतो -

भारती कालिदासस्य दुर्व्याख्याविषमूर्च्छिता।
एषा संजीवनी टीका तामद्योज्जीवयिष्यति॥

(कालिदासाचे समृद्ध वाङ्मय आतापर्यंत वाईट व्याख्यांमुळे मूर्च्छित झाले आहे. ही संजीवनी टीका त्या वाङ्मयाला पुन्हा जागृत करील.) वल्लभदेव आणि हेमाद्रि हे कालिदासाचे मल्लिनाथपूर्व टीकाकार आहेत. त्यांच्या टीका न आवडल्यामुळे मल्लिनाथाने आपली स्वतंत्र टीका लिहिली असावी. श्रीहर्षाच्या नैषधीयचरितावरच्या टीकेचे नाव 'जीवातु' असे आहे. जीवातु ही नवीन जीवन देणारी एक वनस्पती आहे. संजीवनी आणि जीवातु शब्दाचा अर्थ एकच आहे. संजीवन देणारी हा दोन्ही शब्दांचा अर्थ. या काव्यावरही मल्लिनाथपूर्व पाचसहा टीका आहेत.

त्याच्या इतर काव्यांच्या टीकांची नावे जरी आधीच्या टीकांचा उपमर्द करत नसली तरी काव्य समजून देण्याची त्यांची मूलगामी भूमिका स्पष्ट करणाऱ्या आहेत. भारवीने किरातार्जुनीय हे महाभारतातल्या एका कथाविषयावर काव्य रचले. मल्लिनाथाने त्याच्या या काव्यावर आणि गर्भितार्थ उलगडून दाखवणारी 'घण्टापथ' नावाची टीका लिहिली. घण्टापथ म्हणजे राजमार्ग. राजमार्गावरून हत्ती जातात. त्यांच्या गळ्यातल्या घंटांचा किणकिणणारा आवाज येतो. म्हणून राजमार्गाला घण्टापथ असे म्हणतात. मल्लिनाथाची ही टीका भारवीचे काव्य समजून घेण्याचा राजमार्ग आहे हे त्याला ध्वनित करायचे आहे.

माघाच्या शिशुपालवधावर मल्लिनाथाने परिपूर्ण अशी 'सर्वंकषा' नावाची टीका लिहिली. रावणवध नावाचे काव्य भट्टी नावाच्या विद्वान कवीने रचले. याची रचना संस्कृत महाकाव्यांमध्ये होत नसली तरी ते एक महत्त्वाचे काव्य मानले आहे. भट्टीने पाणिनीच्या सूत्रांचा आणि अलंकारांचा उपयोग खुबीने केला आहे. या काव्याचे तंत्र समजून देणारी 'सर्वपथीना' नावाची टीका मल्लिनाथाने लिहिली.

तो केवळ या महाकाव्यांवरच टीका लिहून थांबला नाही. विद्याधर नावाच्या साहित्यशास्त्रकाराच्या 'एकावली' नावाच्या ग्रंथावर त्याने 'तरला' नावाची टीका लिहिली. वरदराजाच्या 'तार्किकरक्षा' या न्यायशास्त्राच्या ग्रंथावर 'निष्कण्टका' नावाची टीका लिहिली. या टीकांचा अभ्यास केल्यावर मल्लिनाथाचा विविध शास्त्रग्रंथांचा अभ्यास होता हे जाणवते. वैदिक वाङ्मयातले बारकावे तो देतो. इतर संस्कृत टीकाकारांप्रमाणे तो अमरकोश, विश्वकोश इ. विविध कोश आणि त्यावरच्या टीकांमधली आवश्यक ती उद्धरणे देतो. त्याची टीका लिहिण्याची पद्धत त्याने त्याच्या एका श्लोकात सांगितली आहे -

इहान्वयमुखेनैव सर्वं व्याख्यायते मया।
नामूलं लिख्यते किञ्चिन्नानपेक्षितमुच्यते॥

(या टीकेमध्ये मी अन्वयानुसारच लिहिले आहे. मुख्य ग्रंथाचा ज्याला आधार नाही आणि जे आवश्यक नाही ते मी सांगितले नाही.)

मल्लिनाथ फक्त टीकाकार नव्हता. त्याने काही स्वतंत्र ग्रंथ देखील लिहिले आहेत. त्यात रघुवीरचरितम् आणि उदारचरितम् हे काव्यग्रंथ आहेत.

'वैश्यवंशसुधाकर' हा त्याने रचलेला दुसरा धर्मशास्त्राचा महत्त्वाचा ग्रंथ. विजयनगरच्या संगम वंशामध्ये इ. स. १३२५ ते १४८५ या कालखंडामध्ये देवराय (दुसरा) किंवा प्रौढदेवराय नावाचा एक राजा होऊन गेला. त्याच्या राजवटीमध्ये वैश्यसमाजाचे काही प्रश्न होते. हे प्रश्न सोडवण्यासाठी त्याने काही विद्वान मंडळींना पाचारण केले. मल्लिनाथ त्यांचा अध्यक्ष असावा. या निवाड्याचा वृत्तांत त्याने प्रस्तुत ग्रंथात मांडला आहे.

आजच्या कालिदास दिनानिमित्त त्यांच्या प्रसिद्ध टीकाकाराचे स्मरण करणे औचित्यपूर्ण ठरेल.

(लेखिका संस्कृत प्रगत अध्ययन केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या निवृत्त प्राध्यापिका आहेत.)

काश्मीरमधील महाराष्ट्र सदन रखडले

अनुजा चवाथे
anuja.chawathey@timesofindia.com

मटा विशेष

घोषणेला दोन वर्षे होऊनही कामाला सुरुवात नाही

- पर्यटन, यात्रेदरम्यान अडचणी आल्यास हक्काचे ठिकाण
- सदनासाठी जमिनीचे हस्तांतरण, आराखडाही तयार
- स्थानिक ग्रामपंचायतीचाही पाठिंबा

चित्र: एआय

मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालावे

काश्मीरमधील महाराष्ट्र सदनासाठी जमीन हस्तांतरण कार्यवाही पूर्ण होऊनही हे काम पुढे सरकलेले नाही. त्यामुळे निधी रद्द होण्याची भीती आहे. या प्रकल्पासाठी एका समितीची स्थापना करण्यात आली होती. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष घालावे, अशी मागणी समितीचे सदस्य, सरहद संस्थेचे संस्थापक संजय नहार यांनी केली आहे.

मुंबई : महाराष्ट्रातील पर्यटक मोठ्या संख्येने जम्मू आणि काश्मीरमध्ये फिरण्यासाठी जातात. या पर्यटकांना काश्मीरमध्ये फिरताना, कधी अमरनाथ यात्रेच्या वेळी अडचणी भेडसावतात. त्या वेळी विदेशांमध्ये जसे भारतीय दूतावास असतात त्याचप्रमाणे दूतावासासारखे काम करणाऱ्या महाराष्ट्र सदनाची निर्मिती आवश्यकता भासते. दोन वर्षांपूर्वी या महाराष्ट्र सदनाची राज्य सरकारने घोषणा केली. यासाठी जमीनही उपलब्ध झाली. मात्र याचे काम अद्याप सुरू झालेले नाही.

काश्मीर आणि महाराष्ट्राचे नाते निराळे असल्याने काश्मीरच्या बडगाम जिल्ह्यातील स्थानिकांनी महाराष्ट्र सदनासाठी जमीन देताना विरोध केला नाही. काश्मीरचा स्थानिक नागरिक पर्यटन व्यवसायावर जगतो. त्यामुळे हे महाराष्ट्र सदन दोन्ही राज्यांमधील सांस्कृतिक, औद्योगिक दुवा बनून मदत करेल या विश्वासाने हे जमीन हस्तांतरण करण्यात आले. या महाराष्ट्र सदनाचा आराखडाही तयार झाला, मात्र प्रत्यक्ष बांधकामाला अद्याप सुरुवात झालेली नाही. परिणामी, हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प रखडल्याने उद्योग, पर्यटन, शेती, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि महाराष्ट्र-काश्मीर संबंध अधिक दृढ करण्याची मोठी संधी अद्याप प्रत्यक्षात आलेली नाही. यासंदर्भात जमीन अधिग्रहणासाठी उशीर झाल्याने पुढील प्रक्रिया रेंगाळल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सूत्रांनी सांगितले. मात्र आता हे पुढील काम कधीपर्यंत पूर्ण होऊ शकेल, याचा मात्र अंदाज मिळालेला नाही.

प्रस्तावित महाराष्ट्र सदनामध्ये महाराष्ट्र माहिती केंद्र, राज्याची संस्कृती आणि इतिहास मांडणारे दालन, बैठकांसाठी आवश्यक सुविधा उभारण्याचे नियोजन आहे. राज्यातील मंत्री, अधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच पर्यटकांना सुविधा उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे.

यामध्ये स्थानिकांच्या रोजगारावर टाच येऊ नये यासाठी निवासी व्यवस्थेची मोठी तरतूद नाही. या माध्यमातून काश्मीरमधील सफरचंद, केशर, फळबागायती अशा इतर अनुभव महाराष्ट्रातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे, तसेच दोन्ही राज्यांतील कृषी, उद्योग आणि व्यापार क्षेत्रामध्ये दुवा निर्माण करण्याची भूमिका पार पाडणे अपेक्षित आहे. इचगाम परिसरातील ग्रामपंचायतीने महाराष्ट्र सदनासाठी जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला होता.

हर्णैच्या किल्ल्याचा बुरुज कोसळला

म. टा. वृत्तसेवा, चिपळूण

रत्नागिरी जिल्ह्यातील हर्णै येथील ऐतिहासिक गोवा किल्ल्याचा उत्तरेकडील बुरुज कोसळल्याने पुरातत्त्व विभागाच्या दुरुस्ती कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. राज्य संरक्षित स्मारक संवर्धन योजनेअंतर्गत सुमारे ६ कोटी ७१ लाख रुपये खर्चून गेल्या दोन वर्षांपासून किल्ल्याच्या जतन व दुरुस्तीचे काम सुरू असतानाच तटबंदीचा हा भाग ढासळल्याने इतिहासप्रेमी, दुर्गप्रेमी आणि स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

विशेष म्हणजे, हर्णै समुद्रातील सुवर्णदुर्ग किल्ल्याचा नुकताच युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश झाला असताना, त्याच्या समोरील ऐतिहासिक गोवा किल्ल्याची तटबंदी कोसळल्याने संवर्धनाच्या कामांवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

बुरुज कोसळण्याच्या घटनेची सखोल चौकशी करून दुरुस्तीच्या कामाच्या गुणवत्तेची तपासणी करावी, अशी मागणी दुर्गप्रेमी आणि स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

गुरबीर सिंग यांना दिलासा नाहीच

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

- 'प्रेस क्लब'च्या कारवाईविरोधातील अर्ज उच्च न्यायालयाने फेटाळला
- 'आरोपींची बैठक प्रथमदर्शनी क्लबची प्रतिमा मलीन करणारी'

"क्लबने सदस्यावरील गैरवर्तनाच्या आरोपांची केलेली चौकशी ही न्यायालयीन खटल्याप्रमाणे पाहता येणार नाही. कारण दाखवा नोटीस देणे आणि त्याच्या सुनावणीची संधी उपलब्ध करून देणे, हे नैसर्गिक न्यायतत्त्वांचे पालन करण्यासाठी पुरेसे ठरते. त्यामुळे क्लबच्या हकालपट्टीचा निर्णय नैसर्गिक न्यायतत्त्वांचे उल्लंघन करणारा असल्याचे अर्जदाराचे म्हणणे मान्य करता येणार नाही.
- न्या. प्रफुल्ल खुबलकर

एल्गार परिषद व माओवाद्यांशी संबंध प्रकरणातील आरोपींच्या कथित कार्यक्रम आयोजित केल्याच्या आरोपांमुळे अडचणीत आलेले ज्येष्ठ पत्रकार गुरबीर सिंग यांना मुंबई उच्च न्यायालयाकडूनही दिलासा मिळू शकलेला नाही. मुंबई प्रेस क्लबचे सदस्यत्व रद्द करण्याच्या क्लबने केलेल्या कारवाईविरोधातील त्यांचा अर्ज न्या. प्रफुल्ल खुबलकर यांनी फेटाळून लावला.

प्रेस क्लबच्या व्यवस्थापन समितीने सिंग यांना नोटीस बजावल्यानंतर आणि २५ एप्रिल रोजी चौकशी अहवाल आल्यानंतर २० एप्रिलला कारवाईचा ठराव केला होता. त्याविरोधात सिंग यांनी दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला. यासंदर्भातील त्यांचा अर्ज दिवाणी न्यायालयाने १ जुलै रोजी फेटाळला. सिंग यांनी उच्च न्यायालयात कारवाई स्थगित करण्यास आणि प्रेस क्लबची निवडणूक लढण्यास परवानगी देण्याच्या विनंतीचा अर्जही केला होता. सुनावणीअंती न्या. खुबलकर यांनी २२पानी निर्णय देऊन अर्ज नुकताच फेटाळून लावला. 'अर्जदाराने एल्गार परिषद-माओवाद्यांशी संबंध प्रकरणातील आरोपींच्या बैठकीसाठी मदत केली होती, हे निर्विवाद आहे. चौकशी समितीच्या अहवालाआधारे एनआयएने जामीनअटींचा भंग झाल्याने आरोपींचा जामीन रद्द होण्यासाठी न्यायालयात अर्जही केले आहेत. त्यामुळे आरोपींच्या बैठकीसाठी अर्जदाराने केलेली मदत ही क्लबची प्रतिमा मलीन करणारी कृती म्हणून पाहिली जाऊ शकते. चौकशी समितीने क्लबची प्रतिमा मलीन झाल्याबाबत स्पष्ट निष्कर्ष नोंदवलेला नाही, हा अर्जदाराचा युक्तिवाद ग्राह्य धरता येणार नाही. कारण चौकशी समितीच्या अहवालाआधारे व्यवस्थापन समितीने स्वतंत्रपणे तो निष्कर्ष काढला आहे. तो मनमानी किंवा अविवेकी वाटत नाही', असे निरीक्षण न्यायमूर्तींनी नोंदवले.

शिक्षकांवर आणखी एका समितीचे ओझे

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

अमली पदार्थमुक्त शाळांसाठी स्वतंत्र तरतूद

मुंबई शहर व उपनगरांतील शाळा-महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना अमली पदार्थांच्या विळख्यात जाण्यापासून रोखण्यासाठी प्रत्येक संस्थेत 'अमली पदार्थमुक्त मुंबई मार्गदर्शन व समुपदेशन समिती' नेमण्याचे निर्देश मुंबई उपनगर जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. या समितीत मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि समुपदेशकाचा समावेश असणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती, समुपदेशन आणि पालकांशी समन्वय साधण्याची जबाबदारी या समितीवर असेल. मात्र, या निर्णयामुळे शिक्षकांमध्ये पुन्हा नाराजीचा सूर उमटला आहे.

एका बाजूला अमली पदार्थमुक्त शाळांसाठी समिती नेमण्याचा निर्णय झाला असताना, दुसऱ्या बाजूला त्याविरोधात शिक्षक व मुख्याध्यापकांनी नाराजी व्यक्त केली आहे. गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी शाळा स्तरावरील १७ विविध समित्यांचे एकत्रीकरण करत चार ते पाच समित्यांमार्फतच काम करण्याचे निर्देश दिले होते. आता त्यात शालेय शिक्षण विभागाला बाजूला ठेवून इतर विभाग वाढ करणार असल्याने शिक्षकांमध्ये नाराजी आहे.

शहर आणि उपनगरांत सुमारे तीन हजार शाळा व महाविद्यालयांमध्ये ही समिती स्थापन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. समितीचे अध्यक्ष मुख्याध्यापक किंवा प्राचार्य असतील. दोन शिक्षक, दोन पालक, दोन विद्यार्थी आणि समुपदेशक सदस्य म्हणून काम पाहतील. विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीबाबत नियमित जनजागृती करणे, गरजेनुसार समुपदेशन करणे, वर्तनातील बदलांवर लक्ष ठेवणे, तसेच आवश्यकतेनुसार पालक आणि तज्ज्ञांशी समन्वय साधणे, ही समितीची प्रमुख जबाबदारी असेल.

'अमली पदार्थांना आळा घालण्याचे काम विद्यार्थी सुरक्षा समितीमार्फत केले जाऊ शकते. जवळपास सर्वच शाळा याबाबत कटाक्षाने तपासणी करत असतात. मग आता वेगळी समिती नेमून शिक्षकांच्या मानेवर या समितीचे अहवाल सादर करण्याचे जोखड कशासाठी द्यायचे', असा प्रश्न पूर्व उपनगरातील एका खासगी शाळेच्या मुख्याध्यापकाने उपस्थित केला.

पुण्यात 'एटीएस'चे ६६ ठिकाणी छापे

म. टा. प्रतिनिधी, पुणे

शहजाद भट्टीशी संपर्क असल्याने कारवाई

पाकिस्तानस्थित गुंड आणि दहशतवादी कारवायांशी संबंधित असल्याचा संशय असलेला शहजाद भट्टी याच्याशी सोशल मीडियाच्या माध्यमातून संपर्कात आलेल्या ५० जणांची राज्य दहशतवादविरोधी पथकासह (एटीएस) स्थानिक पोलिसांनी मंगळवारी चौकशी केली. पुणे शहर, पिंपरी-चिंचवड आणि पुणे जिल्ह्यातील ६५ ठिकाणी एकाच वेळी छापे टाकून संशयितांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या ताब्यातील मोबाइल आणि अन्य डिजिटल साहित्य जप्त करण्यात आले आहे.

चार दिवसांपूर्वी 'एटीएस'ने राज्यातील विविध शहरांत विशेष मोहीम राबवत २०० संशयितांची चौकशी केली होती. महाराष्ट्रातील काही तरुण शहजाद भट्टीच्या संपर्कात असल्याची माहिती समोर आल्यानंतर पुणे विभागात ही कारवाई करण्यात आली. मंगळवारी सकाळी 'एटीएस'च्या २२ पथकांनी कोंढवा, येरवडा, विश्रांतवाडी, कोथरूड, पर्वती, तसेच पिंपरी-चिंचवडमधील चाकण, म्हाळुंगे, वाकड, चिखली, आळंदी, कुदळवाडी आणि जिल्ह्यातील शिक्रापूर, शिरूर, रांजणगाव, राजगुरुनगर परिसरात छापेमारी केली. या कारवाईत ५० जणांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या मोबाइलमधील चॅट, सोशल मीडिया अकाउंट्स आणि अन्य डिजिटल माहितीची पडताळणी केली जात आहे.

तपास यंत्रणांच्या माहितीनुसार, पाकिस्तानमध्ये बसून शहजाद भट्टी भारतातील तरुणांशी संपर्क साधत होता. दिल्ली, पंजाब, हरियाणा आणि उत्तर प्रदेशातील तपासात त्याचे असे नेटवर्क उघडकीस आल्यानंतर महाराष्ट्रातील काही तरुणांशीही त्याचा संपर्क असल्याचे निष्पन्न झाले.

'एटीएस'च्या अधिकाऱ्यांनी सांगितले, की 'देशविघातक कारवायांसाठी तरुणांना प्रवृत्त करण्याचे प्रयत्न होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर ही मोहीम हाती घेण्यात आली. चौकशीत गंभीर बाबी आढळल्यास संबंधितांविरोधात कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.' 'एटीएस'च्या तपासात ताब्यात घेतलेल्या एका तरुणाच्या बँक खात्यात पाकिस्तानमधून पैसे जमा झाल्याची बाब समोर आली आहे. याबाबत तपास सुरू आहे.